# BK BIRLA CENTRE FOR EDUCATION

**SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS**
**SENIOR SECONDARY CO-ED DAY CUM BOYS' RESIDENTIAL SCHOOL**
**POST MID-TERM EXAMINATION 2024-25**
**MARATHI**

Class : VII | Duration : **1** Hrs
Date : 11.01.2025 | Max. Marks : **25**
Admission No.: | Roll No.:

---

## खंड – वाचन कौशल्य

**प्र 1 पठीत गदयांश :–** **(4)**

**खालील गदयांश काळजीपूर्वक वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :–**

अकबराचा दरबार भरला होता.अकबर बादशहा सिंहासनावर बसला होता. बिरबल शेजारीच उभा होता. इतक्यात तिथे एक भिल्ल आला. त्याच्या हातात एक पिंजरा होता. त्यात एक सुंदर पोपट होता.

भिल्ल सिंहासना पाशी आला. त्याने अकबराला सलाम केला तो म्हणाला, हुजूर ,मी आपणांसाठी एक भेट आणली आहे .हा पोपट मला रानात मिळाला . हा पोपट काही वेगळाच आहे. कारण हा सर्व काही बोलतो. इतकेच नव्हे तर कुठल्याही प्रश्नाचे उत्तर देतो.

अकबर म्हणाला,असं ?तर मी याची परीक्षाच घेतो. असे म्हणून बिरबलाकडे बोट करुन त्याने पोपटाला विचारले, पोपटा हा कोण ?सांग पाहू पोपट पटकन म्हणाला, हुजूर हे आपले मित्र बिरबल आहे. हे त्याचे उत्तर ऐकताच सर्व आश्चर्याने थक्क झाले.

पंश्न :–

1 भिल्लाच्या हातात काय होता ?

**(क)** पिंजरा **(ख)** पोपट **(ग)** खाऊ

2 भिल्लाला पोपट कोठे मिळाला होता ?

**(क)** महालात **(ख)** रानात **(ग)** घरात

3 कोणाचा दरबार भरला होता ?

**(क)** शिवाजी महाराजांचा **(ख)** पृथ्वीराजाचा **(ग)** अकबराचा

4 अकबराच्या मित्राचे नाव काय होते ?

**(क)** कृष्णदेवराय **(ख)** बिरबल **(ग)** हरीहर

## खंड–ख व्याकरण

**प्र 2 विरुधार्थी शब्द लिहा –** **(2)**

1 प्रकाश x

2 काळा x

**प्र 3 काळ ओळखा :–** **(2)**

1 मुंबई हा सात बेटांचा समूह होता .

2 मुंबादेवी ही कोळयांची देवी म्हणून प्रसिध्द आहे.

**प्र 4 खालील शब्द शुद्ध करून लिहा –** **(2)**

1 भाखरी

2 भाउ

**प्र 5 समानार्थी शब्द लिहा :–** **(2)**

1 मंदिर

2 समुद्र

## खंड – ग साहित्य

**प्र 6 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा –** **(8)**

1 भाकरीच्या वासाने कोण रडत असे ?

2 आई सकाळपासून कुठे व का जात असे ?

3 गुरूने शिष्याला कोणता उपदेश दिला ?

4 शेवटी गुरूदेव काय म्हणाले ?

## खंड – घ लेखन

**पं 7 आपली खुशाली कळविणारे पत्र आईला लिहा :–** **(5)**

**———— समाप्त —————**